The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत तुकारामांच्या अभंगातील मूल्य विवेक

**प्रा. डॉ. पुरुषोत्तम शेषराव जुन्ने**
मराठी विभाग प्रमुख, गोदावरी कला कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, अंबड जी जालना.

आज पर्यंत संत तुकाराम महाराजांच्या अभंगांचा विविध प्रकारे अभ्यास करण्यात आलेला आहे. हा अभ्यास मराठी भाषेला, मराठी मूल्यविवेकाला पुढे नेणारा, काळ सुसंगत ठरणारा आणि समाजभान देणारा असल्यामुळे या अभंगांचा पुन्हा पुन्हा अभ्यास करणे गरजेचे आहे. इतर संतांपेक्षा तुकाराम महाराज कोणकोणत्या बाबतीत वेगळे आहेत हा आपल्या अभ्यासाचा विषय नसून संत तुकारामांच्या अभंगातील मूल्य विवेक कशाप्रकारे समाजाला दिशा देण्याचे कार्य करतो, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. आज संत तुकाराम जागतिक पातळीवरील एक महत्त्वाचे कवी म्हणून गणले जातात. एखाद्या उत्तम साहित्यिकाच्या साहित्यातील मूल्यसंदर्भ हे कालातीत आणि वादातीत असल्यामुळे त्याकडे त्याच दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक ठरते. तुकाराम महाराजांच्या अभंग रचनेत असे कितीतरी अभंग आपणास सापडतील जे समाजाला दिशा देण्याचे कार्य करतात. किंबहुना तुकाराम महाराजांची वाणी ही केवळ समाजाला दिशा देण्यासाठीच त्यांनी वापरली असे म्हटल्यास वावगे ठरू नये. आपले अस्तित्व ज्यासाठी निर्माण झालेले आहे त्या अस्तित्वाला कोठेही तडा जाणार नाही आणि त्याप्रमाणेच आपले व्यक्तित्व आणि कर्तृत्व देखील असले पाहिजे असा भर संत तुकारामांनी आयुष्यभर जपलेला आहे. "एकाच व्यक्तिमत्त्वात विरोधी तत्त्वांचे सह अस्तित्व असते. त्यामुळे व्यक्तिमत्त्वात ताण तयार होतो. हा ताण व्यक्तीच्या क्रिया शक्तीचा मूलस्त्रोत. अस्तित्वाच्या मुळाशी अभावाची अथवा असमाधानाची सतत जाणीव असते. अस्तित्व हे सारखे निर्माण होत असते. अस्तित्व म्हणजे अखंड चालणारी कृती असते. ती एकाच वेळी करूण आणि विनोदी असते."[१]

जीवनाच्या सर्व पातळीवर अध:पतीत झालेला समाज पाहून तुकारामांचे मन गलबलून येत असे. म्हणून अशा समाजाला दिशा देण्यासाठी, त्यांच्यात परिवर्तन घडवून आणण्यासाठी, केवळ मराठी समाजच नव्हे तर वसुधैव कुटुंबकम या उक्तीप्रमाणे विश्व कल्याणाचा विचार करून संत श्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराजांनी आपले पूर्ण जीवन त्या कामी अर्पण केले. संत तुकारामांच्या समग्र काव्यरचनेचा निश्चितच या अंगाने विचार करता येईल. गाथेतल्या कितीतरी अभंगांचा तपशील आपणास त्या रीतीने सापडतो. तुकारामांचे बालपण आई-वडिलांच्या छत्रछायेखाली गेले. लग्नानंतर काही वर्षे सर्व ठीक ठाक चालले. महाजनी, सावकारी सर्व व्यवस्थित चालू होते. आयुष्यातील बरे असल्याचा पूर्व रंग संपला आणि दैन्य, दु:ख, अवहेलना, उद्विग्नता घेऊन उत्तररंग सुरू झाला.

प्राक्तनातील भोग एकेक करून जसे पुढे येऊ लागले तसे तुकोबाही संसारापासून दूर जाऊ लागले. तुकारामांना नसलेपणाच्या चिंतेने ग्रासले. दैनंदिन व्यवहार विषयक भीती वेगळी आणि संपूर्ण अस्तित्व विषयक चिंता निराळी. भीतीला विशिष्ट मर्यादा असतात. ती प्रयत्नांती दूर करता येऊ शकते, परंतु चिंता ही एक अनामिक प्रक्रिया असते. त्यात सहेतुकता नसते. या असमाधानातून, अभावातून तुकारामांनी तत्कालीन अभंग काव्याला जवळ केले. अस्तित्वाची नश्वरता त्यांच्या लेखणीतून वारंवार प्रत्ययास येते. मानवी मन नेहमीसाठी विनोदी राहू शकत नाही, परंतु त्यास आत्ममग्न विरक्ती नेहमी भावते. याच कारणामुळे तुकाराम तुम्हा आम्हास भावतात. "तुकाराम हा आपल्यापैकीच एक आहे. पुष्कळदा आपलेच विचार, विकार बोलून दाखवत आहे. आपल्यासारखा वैतागत आहे, संतापत आहे. मधूनच प्रसन्न होत आहे. जे आपल्याला काही केल्या साधत नाही, ते त्याने साधलेले असले - अगदी यशस्वीपणे साधलेले असले - तरी ते साधताना त्याला अतोनात कष्ट पडलेले आहेत, हे त्याला जाणवते व म्हणूनच तुकाराम त्याला जवळचा वाटतो"[२]

धर्माची तू मूर्ती | पाप पुण्य तुझे हाती
मज सोडवी दातारा | कर्मापासून दुस्तरा
करीशी अंगीकार | तरी काय माझा भार
जीवीच्या जीवना | तुका म्हणे नारायणा

अशा असंख्य अभंग रचनांमधून तुकाराम हा भवसागर पार करण्यासाठी भगवंतांची आळवणी करतात. तुकाराम जेव्हा मज सोडवी दातारा | कर्मापासूनच दुस्तरा असे म्हणतात तेव्हा त्यांच्या व्यक्तित्वातील असाह्यता अधोरेखित होत असते. रूपविवेचनवादानुसार मला मिळालेले स्वातंत्र्य हे मिळालेले नसते तर ते अर्जित असते. मानवी जाणिवेच्या किंवा प्रयत्नांच्या पलीकडे मी कुठेतरी जखडलेला आहे. त्यामुळे दुस्तर कर्म करणे माझ्याकडून होणार नाही, परंतु त्यापासून मला पळही काढता येणार नाही. कारण हा रस्ता आपणच निवडलेला आहे. देह भोग भोगे घडे | जे जे जोडे ते बरे असे म्हणण्यावाचून गत्यंतर नाही. बरे असे म्हणत असतानाही तुकाराम देहभोग म्हणतात. याचा अर्थ अनिच्छेने हे सर्व करावे लागत आहे. वस्तू निवडीच्या स्वातंत्र्यांमध्ये मी अध्याहृत असला तरी स्वरूपसत्ता आणि आत्मनेसत्ता यातील अंतर कलहामुळे ताण निर्माण होतो. मग काही का असेना एकदा आपण निवड केलीच आहे तर जे जे प्राप्त होईल ते बरे म्हणण्या वाचून पर्याय नसतो.

संत तुकाराम एक समर्थ वारकरी संप्रदायातील कवी होते. "ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाने वारकरी संप्रदायाची पायाभरणी केली. त्यांच्या विचारसरणीचा आदर्श पुढे ठेवून महाराष्ट्रातील भागवत धर्मीयांनी आपल्या पारमार्थिक जीवनाची वाटचाल केली. संत नामदेवांपासून तुकारामांपर्यंत संत मंडळींनी या परंपरेशी एकरूप होऊन त्या त्या कालखंडातील पारमार्थिक जीवनाचे प्रतिनिधित्व केले. त्यांच्या

व्यक्तिमत्त्वाची छाप तत्कालीन समाजावर पडून महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या जीवनात एक प्रकारचे चैतन्य निर्माण झाले, अस्मिता जागृत झाली."[3] याचे महत्त्वाचे कारण असे की, त्यांना स्व अस्तित्वाबद्दलची तसेच समाज विषयक भक्कम अशी समजूत होती, जाणीव होती. अस्तित्वाची जाणीव असणे म्हणजे काय? तर आपले अस्तित्व मृत्यूने सीमित झाले आहे, आरपार भेदलेले आहे ही जाणीव बाळगून जगायचे. झुरणी पांझरा, खूप आहे आता, येई पंढरीनाथा भेटावया किंवा तुका म्हणे नाही ठावी | स्थिती मती यमाची, निश्चिती कुळवाडी किंवा तुका म्हणे आत्महत्या रे घात ती थोर होते चुकी नारायणे किंवा तुका म्हणे बाप्पा चुक्वी चौर्यांशीच्या खेपा अशा ओव्या उद्धृत करता येतील. समग्र प्रकृतीच्या हिशेबी आपले अस्तित्व नगण्य आहे आणि प्रयत्नपूर्वकरीत्या देखील आपण त्याच्याशी एकरूप होऊ शकत नाही. समरूपता ही तर आणखी दूरची गोष्ट होईल. कोठवरी जिने संसाराची आशा म्हणत असताना तहान भूक त्यांचे राखे शीत उष्ण | झाले उदासीन देहभावे असे वक्तव्य तुकाराम महाराज करतात. संसार आणि परमार्थाची वाटचाल करताना आपणास जे अनुभव आले ते अनुभव त्यांनी अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी या शब्दात शब्दबद्ध केल्याचे दिसते. मानवाची मानवता, एकता, अखंडता, सेवानिष्ठता, सर्वधर्मपरायणता या सर्व बाबी तुकोबांच्या अभंग गाथेत आढळून येतात. तुकोबांच्या अभंगातील कित्येक अभंग किंवा ओव्या या मराठी माणसाच्या बोलण्यात आज वाक्प्रचार म्हणून समोर येतात. ते खरेखुरे जनसामान्यांचे कवी आहेत. वृत्तीने परखड असलेले संत तुकाराम महाराज कधी कधी कोमल आणि सहृदय देखील जाणवतात. जन्मसिद्ध उच्च नीच भाव विद्वतेचा अहं, कर्मकांडावरील त्यांचे प्रहार, धार्मिकतेचे ढोंग इत्यादी बाबतीत संत तुकारामांनी मोठ्या परखड शब्दात प्रहार केलेला आहे. तुकारामांच्या शब्दात असलेली वास्तवाची प्रखर जाणीव हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा एक प्रमुख गुण म्हणून पुढे येतो. त्यांनी आपल्या अभंगातील अनेक दृष्टांत रोजच्या जगण्यातून, अनुभवातून उचललेले आहे. त्यांची भाषा जशी कठोर आहे तसेच ती प्रसंगी मऊमेनाहू नही कोमल अशा स्वरूपाची देखील दिसून येते.

प्रारंभिक आयुष्य सुखा समाधानाने व्यतीत होत असताना व्यवसाय दिवाळखोरीत निघणे आणि आपले म्हणणारे सर्व दूर होणे, यातून स्वतःच्या अस्तित्व संघर्षासाठी केलेले कष्ट, येणारा वैताग या सर्व गोष्टी अस्तित्व विषयक जाणीव निर्माण करणाऱ्या आहेत. "तुकाराम जातीने शूद्र व व्यवसायाने वैश्य होते. त्यांनी आपल्या अभंगात या गोष्टीचा उल्लेख केलेला आहे त्यांच्याविषयी गं. बा. सरदार म्हणतात, 'महाराष्ट्रात शहरी थोडी आणि त्यामानाने व्यापारही बेताचाच. यामुळे येथील सर्वसाधारण वैशांची स्थिती शूद्राहून फार भिन्न नव्हती. तेव्हा महाराष्ट्रातील बहुजन समाजाची संस्कृती ही मुख्यतः शेतकऱ्यांची व कारू नारूंचीच होती असे म्हणावयास हरकत नाही. या वर्गाच्या भावना आणि आकांक्षा तुकारामांच्या वाङ्मयात आत्मीयतेने प्रकट झाल्या आहेत. हेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

त्यांचा अलौकिक जीवनक्रम शुद्रातिशुद्रांच्या दृष्टीने अभिमानास्पद व स्फूर्तीदायक आहे."[४] तुकाराम अधिकाधिक मुलगामी होत जाण्यापाठीमागे हे एक प्रमुख कारण आहे. प्रत्येक कृतीतले इंगित काय, हे दाखविण्यास त्यांनी सुरुवात केली.

पोटाचे ते नट पाहू नये छंद | विषयाचे भेद विषय रूप
आरती परमार्थ कैसा घडो सके | चित्त लोभी भिके सोंग वाया
देवाचे चरित्र दाखवीतील लिहा | लागवाच्या कळा मोहावया
तुका म्हणे चित्ती राहे अभिलाष | दोघा नरकवास सारी खाची

एखाद्या गोष्टीमध्ये दिखाऊपणा असेल तर ती न केलेली बरी असे आपणास म्हणता येईल. नाटकांमधून काम करणारा नट कितीही चांगले काम करत असला तरी त्याचा तो पोटापाण्याचा व्यवसाय असतो. मूळ अस्तित्व प्रकट होऊ शकत नाही. विषय वासनेचे कितीही तत्त्वज्ञानाच्या पातळीवर विश्लेषण केले तरी विषय त्यात असणारच. प्रत्येक गोष्टीचे असे असते त्यामुळे मनात जोपर्यंत आसक्ती आहे तोपर्यंत दुःख पाठ सोडणार नाही.

तुकारामांचे कितीतरी अभंग आपणास मूल्य विषयक विचार करण्यास प्रवृत्त करणारे आहेत. जसे, नाही सुख मज नलगे हा मान, न राहे हे जाण काय करू, काय खावे आता कोणीकडे जावे | गावात राहावे कोण्या बळे, बाहेर पडलो आपल्या कर्तव्ये | संसाराची जीवे वेटाळलो, कोणते कारण राहिले यामुळे | जे म्या तुझ बळे कष्टवावे, नाही साजत हा मोठा | मज अलंकार खोटा अशा कितीतरी अभंग रचनांमधून आपणास त्यांच्या शब्दरचनेतील मूल्य विवेक दाखवून देता येतो.

भक्ती हा सर्वसामान्य माणसास भवसागर तरून जाण्याचा एक उपाय आहे, परंतु ही भक्ती म्हणावी तेवढी सोपी नाही. कारण भक्ती ही जीवननिष्ठा मानली तरच आपणास त्या भक्तीचा काही उपयोग होऊ शकतो. एकीकडे भक्ती केल्यासारखे दाखवायचे आणि दुसरीकडे दांभिकपणे वागायचे, अशा दुतोंडी माणसांवर तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगवाणीतून परखडपणे टीका केलेली आहे. "आपल्या सभोवती वावरणाऱ्या दांभिक साधूंचे वर्णन तपशीलवारपणे तुकारामांनी केलेले आहे. जगण्याचे साधन म्हणून बरेच पोटार्थी लोक या क्षेत्रात आलेले त्यांना जाणवले. अर्धवट ज्ञानावर ते आपले पोट भरण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांच्या मतलबी वृत्तीवर तुकारामाने परखड प्रहार केला आहे. पाया जाला नारू | तेथे बांधला कापरू | तेथे बिबव्याचे काम | अधमासि तो अधम || अशी भोंदू साधू प्रति तुकारामांची भूमिका आहे."[५] देवावरी विंचू आला | देवपूजा नावडे त्याला | तेथे पैजाराचे काम | अधमाशी तो अधम या पद्धतीने जशास तसा न्याय सांगून - नाव भूताचे पाळण | अणिक निर्दालन कंटकाचे अशा पद्धतीची एक डोळस भक्ती संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगातून सामान्य माणसाला दाखवलेली आहे.

**संत तुकारामांच्या अभंगातील मूल्य विवेक**

**प्रा. डॉ. पुरुषोत्तम शेषराव जुन्ने**

मानवी मनाला चमत्काराचे आकर्षण नेहमीच राहत आले आहे. या चमत्कारामधून समाजात काम करणारे समाजसुधारक किंवा संत देखील सुटलेले नाहीत. संत तुकारामांच्या बाबतीत देखील आपणास या चमत्काराने वेढलेले दिसून येते. जेव्हा तुकाराम महाराजांनी प्रस्थापित व्यवस्थेतील प्रबोधनकारांना झुगारून किंवा दांभिक लोकांना आव्हान देऊन आपल्या अभंगांच्या मदतीने समाज प्रबोधन करायला सुरुवात केली त्यावेळेस समाजातील काही नतदृष्ट लोकांनी त्यांच्या अभंगांचा गाथा इंद्रायणीच्या डोहात फेकून दिला. या प्रसंगाला घेऊन समाजामध्ये चमत्कार झाल्याची मानसिकता तयार करण्यात आली. कारण या अभंगांच्या गाथेला पाण्यात बुडविल्यानंतर तुकाराम महाराजांनी रात्रंदिवस त्या ठिकाणी बसून भजन केले आणि स्वतः परमेश्वराने हे अभंग नदीतून अलगदपणे तुकारामांच्या हाती सोपविले, अशा प्रकारची एक लोककथा समाजामध्ये प्रस्तुत करण्यात आली, परंतु हे खरे नसून तुकाराम महाराजांच्या कीर्तनाला येणारे पंचक्रोशीतील अनेक भक्तांच्या मुखी त्यांचे अभंग नित्यनेमाने रूळलेले होते. या मुखोद्गत अभंगांचे संकलन नंतरच्या काळात करण्यात आले आणि आज दिसणारी गाथा या पद्धतीने आपल्या समोर आलेली आहे. परंतु या चमत्काराच्या मुलाम्यामध्ये माणसाचे प्रयत्न कमी करण्यासाठी प्रस्थापित व्यवस्थेला सोपे जाते. यासोबतच तुकारामांचे सदेह वैकुंठाला जाणे याबाबतीतही अशाच प्रकारची लोककथा गुंफण्यात आली. तुकाराम महाराजांचा खून झाला की ते सदेह वैकुंठाला गेले याबाबत संशोधकांमध्ये आजही मतभेद असल्याचे दिसून येते.

अगदी बाराव्या शतकापासून ते संत तुकाराम यांच्यापर्यंत परंपरा आपण पाहिली तर वारकरी संप्रदायांमध्ये वेळोवेळी ज्यांनी मोलाची भर घातली त्या सर्वांमध्ये समाज प्रबोधन करण्याचे, समाजाला वळण लावण्याचे श्रेय संत श्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्याकडे जाते.

**डॉ. पुरुषोत्तम शेषराव जुन्ने**

**संदर्भ:**

१. वसंत डहाके व इतर (संपा.), संज्ञा-संकल्पना कोश, जी. आर. भटकळ फाउंडेशन, मुंबई, पहिली आवृत्ती, डिसेंबर २००१, पृ. ८८.

२. वा. ल. कुळकर्णी, मराठी कविता : जुनी आणि नवी, पृ. ४३.

३. र. रा. गोसावी, पाच भक्ती संप्रदाय, पृष्ठ २१५.

४. प्रा. डॉ. संतोष चव्हाण, वारकरी संप्रदाय आणि महाराष्ट्रातील संत, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती, जुलै २०२१, पृ. २३८.

५. डॉ. रवींद्र बेम्बरे, संत तुकारामांचा संत विषयक दृष्टिकोन, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, २२ ऑक्टोबर २०२२, पृष्ठ ७५.

## संत तुकारामांच्या अभंगातील मूल्य विवेक

**प्रा. डॉ. पुरुषोत्तम शेषराव जुन्ने**